गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक २१ वा | शुक्रवार ०७ जून २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 21 | Date : 07/06/2024 blow Firday Page 4 Price 4

## भाजपमध्ये मोठ्या संघटनात्मक बदलाचे संकेत

### पक्षाध्यक्षपदासाठी यादव, खट्टर, चौहान यांचा विचार

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

केंद्रातील नव्या सरकारच्या स्थापनेनंतर भाजपमध्ये मोठे संघटनात्मक बदल केले जाणार आहेत. विद्यामान पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांची मुदत महिनाअखेरीस ३० जून रोजी संपत असून त्यांच्या जागी आक्रमक नेत्याची निवड केली जाऊ शकते. मोदी-शहांचे विश्र्वासू भूपेंद्र यादव, धर्मेंद्र प्रधान, सुनील बन्सल यांच्यासह मनोहरलाल खट्टर तसेच शिवराजसिंह चौहान यांच्या नावांचाही विचार केला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपने ‘चारसो पार’चा नारा दिला होता. पण संघटनात्मक शैथिल्यामुळे पक्षाला अपेक्षित यश मिळाले नसल्याचे मानले जात आहे. त्यामुळे पक्ष संघटनेमध्ये मोदी-शहांकडून भाकरी फिरवली जाणार आहे. यादव व प्रधान यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान दिले गेल्यास सुनील बन्सल यांच्यासारख्या संघटनेमध्ये मुरलेल्या नेत्याकडे पक्षाध्यक्षपद सोपवले जाऊ शकते असे सूत्रांचे म्हणणे आहे.




भाजपच्या पक्षाध्यक्षपदी हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर वा शिवराजसिंह चौहान यांचाही विचार केला जाऊ शकतो, असे सांगितले जाते. भाजपला जेमतेम २४० जागा मिळाल्यामुळे संघटनेमध्ये नवी ऊर्जा निर्माण करू शकेल अशा नेत्याकडे सर्वोच्च जबाबदारी दिली जाईल. त्यामुळे खट्टरांची संधी हुकण्याची शक्यता पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

नड्डा यांना पुन्हा केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान दिले जाऊ शकते. पक्षाध्यक्ष होण्याआधी नड्डा यांनी केंद्रीय आरोग्यमंत्रीपद सांभाळले होते. राज्यसभेचे नेते पीयूष गोयल तसेच धर्मेंद्र प्रधान, मनसुख मंडाविया, भूपेंद्र यादव, नारायण राणे असे ज्येष्ठ नेतेही लोकसभेचे सदस्य असतील. त्यामुळे वरिष्ठ सभागृहात नेतेपदाची जबाबदारी नड्डा यांच्याकडे सोपवली जाऊ शकते. राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश या महत्त्वाच्या राज्यांमध्ये भाजपने जागा गमावल्याने इथेही बदलाची शक्यता आहे.

## रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात संपन्न



**अलिबाग/दैनिक यशसिध्दि न्यूज**

ढोलताशांचा गजर, मंत्रोच्चार आणि शंखनाद यांच्या गजरात रायगड किल्ल्यावर ३५१वा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यासाठी राज्यातून एक लाखाहून अधिक शिवभक्त आले होते.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक उत्सव समिती दुर्गराज रायगड यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किल्ले रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे आणि कोल्हापूरचे युवराज शहाजी राजे भोसले, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यावेळी उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या या सोहळ्याची सुरुवात रायगड खोऱ्यातील २१ गावांतील नागरिकांनी एकत्र येऊन गडपूजनाने केली. यानंतर शिरकाई देवी मंदिरात गोंधळ तर जगदिश्र्वर मंदिरात कीर्तन सोहळा झाला. यावेळी शिवभक्तांनी शिवाजी महाराजांना मानवंदना दिली. गुरुवारी सकाळी शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. पहाटे नगारखाना परिसरात ध्वजारोहण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले हे महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने दोन हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी छत्रपती संभाजी राजे यांनी केली. ते किल्ले रायगडावर आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्यादरम्यान बोलत होते.

## गिर्यारोहणासाठी उत्तरकाशीला गेलेल्या समूहातील नऊ जणांचा मृत्यू


### पुण्यातील एका तरुणासह चार जण बेपत्ता

पुणे/प्रतिनिधी: उत्तराखंडच्या उत्तरकाशीमधील सहस्त्रताल शिखरावर चढाई करण्यासाठी गेलेल्या गिर्यारोहकांच्या मोठ्या समूहातील नऊ जणांचा खराब हवामानामुळे मृत्यू झाला आहे. ४,४०० मीटर उंचीवर असलेल्या सहस्त्रताल शिखर आणि आसपासच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून वातावरण खराब आहे. याच दरम्यान, महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील काही गिर्यारोहकांचा एक मोठा समूह या शिखरावर चढाई करण्यासाठी गेला होता. त्यांच्याबरोबर एक स्थानिक मार्गदर्शकही होता. दरम्यान, खराब वातावरणामुळे या समुहातील गिर्यारोहकांचा मार्ग भरकटला. दाट धुखं आणि बर्फवर्षावामुळे या गिर्यारोहकांना २ जून रोजी कोखली टॉपच्या बेस कॅम्पजवळ रात्र काढावी लागली. थंडीमुळे गिर्यारोहकांच्या । पान २ वर



## सोलापुरात पावसाळी वातावरणामुळे खरीप पेरण्यांसाठी शेतकऱ्यांचा उत्साह

सोलापूर/प्रतिनिधी : अवकाळी पावसाच्या पाठोपाठ रोहिणी नक्षत्राच्या पावसामुळे सोलापूरकरांना दिलासा मिळत असून शहर व जिल्ह्यातील काही भागात मागील तीन दिवसांपासून कमीजास्त प्रमाणात पावसाच्या सरी कोसळत आहेत. गुरुवारी दुपारी आकाशात ढग दाटून आले आणि



वादळी वाऱ्यांसह दमदार पावसाला प्रारंभ झाला. नंतर पाऊस थांबला तरी आकाश ढगांनी भरले होते.सोलापूर शहरासह उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ आदी तालुक्यांत तीन दिवसांपासून पावसाच्या सरी कोसळत आहेत. करमाळा तालुक्यातही एकाच दिवशी ३२.७ मिलीमीटर इतका दमदार पाऊस झाला. पंढरपूर, सांगोला, माळशिरस व अन्य भागांतही पावसाला समाधानकारक सुरुवात झाली आहे. त्यामुळे खरीप हंगामात पिकांच्या पेरण्यांची तयारी करणाऱ्या शेतकऱ्यांचा हुरूप वाढला आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यात २४.२ मिमी पाऊस झाला असून तीन दिवसांत ६०.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. अन्य तालुक्यांमध्ये पडलेला आणि १ ते ६ जूनपर्यंत पडलेला पाऊस कंसात असा -

दक्षिण सोलापूर- १०.२ (२५.९), बार्शी- ९.३ (१४.४), अक्कलकोट- ४.५ (३१.९), मोहोळ- १५.९ (५७.७), माढा- ७.९ (३६.९), करमाळा - ३२.७ (५३.२), पंढरपूर - २४.१ (२८.१), सांगोला - १५.६ (१७.५), माळशिरस - ११.२ (२५.३) आणि मंगळवेढा - ३.९ (४.५). जिल्ह्यात एकाच दिवशी सरासरी १४.२ मिमी पाऊस झाला असून १ जून ते ६ जूनपर्यंत सरासरी ३०.७ मिमी पाऊस झाला आहे. रोहिणी नक्षत्राच्या शेवटच्या दिवशी, गुरुवारी शहर व परिसरात पावसाळी वातावरण पाहायला मिळाले असून उद्या शुक्रवारी मृग नक्षत्राला प्रारंभ होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

## बेवारस मयताबाबत ओळख पटविण्यासाठी संपर्क करण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधी : बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत दि.१७ मार्च २०२४ रोजी एसटी स्टँडच्या पाठीमागे नळे प्लॉट,समर ट्रान्सपोर्ट या दुकाना समोर एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ७० वर्षे वयोगटातील इसम हा मृत अवस्थेत मिळून आला होता. सदर बेवारस मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी नातेवाईकांचा तपास केला असता, कोणतीही माहिती न मिळाल्याने पोलीस विभागाने मृतदेहाचे बार्शी येथील सरकारी दवाखन्यात पोस्ट मार्टम करून, बार्शी नगरपरिषदे मार्फत बेवारस म्हणून धार्मिक अंत्यविधी करण्यात आला आहे. याबाबत सदर मयताच्या नातेवाईकांनी बार्शी शहर पोलीस ठाणे येथे संपर्क करावा असे आवाहन सहा.पोलीस निरिक्षक एम.ए. गळगटे यांनी केली.

## खासदार विशाल पाटील यांचा काँग्रेसला पाठिंबा

**सांगली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सांगली लोकसभा मतदारसंघातून अपक्ष निवडून आलेले खासदार विशाल पाटील यांनी काँग्रेसचे सहयोगी सदस्यत्व बुधवारी स्वीकारले. यासाठीचे पत्र त्यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना दिले. माजी राज्यमंत्री आमदार डॉ. विश्र्वजित कदम यांच्यासोबत खासदार पाटील आजच मुंबईला रवाना झाले होते. मुंबईत प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांची भेट ते घेणार होते. मात्र मुंबईत अधिक वेळ न दवडता आमदार कदम यांनी खासदार पाटील यांना घेऊन थेट दिल्ली गाठली. दिल्लीत खरगे यांची भेट घेऊन काँग्रेसला पाठिंबा देत असल्याचे पत्र दिले. पाटील यांच्या काँग्रेसला पाठिंबा देऊन सहयोगी सदस्यत्व स्वीकारल्याने काँग्रेसचे राज्यातील संख्याबळ १४ तर देशात १०० झाले आहे. आज सोनिया गांधी व राहुल गांधी यांची भेट घेऊन उद्या दोघेही मुंबईत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेणार आहेत.



## विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या तिमाही बैठकीचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधी : पुणे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची तिमाही बैठक सोमवार १० जून रोजी सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नवीन इमारतीत सभागृह क्र.१ येथे आयोजित करण्यात आली असल्याचे महसूल उप आयुक्त वर्षा लड्डा यांनी कळविले आहे. प्रत्येक तीन महिन्यातून एकदा त्या महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी लोकशाही दिन झाल्यानंतर भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक घेण्यात येते. या बैठकीत तीन महिन्यांत आलेल्या तक्रारी व त्यावर केलेल्या उपाययोजनांबाबत आढावा घेण्यात येतो.

## बुरखा परिधान करून सराफी दुकानात ‘हाथ की सफाई’; चार महिलांचा शोध

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापुरात वेगवेगळ्या भागातील बाजारपेठांमध्ये सराफी दुकानांमध्ये हातचलाखीने सोने-चांदीचे दागिने लांबविणाऱ्या चार बुरखाधारी महिलांचा शोध घेण्यास पोलिसांना यश आले आहे. यात एका वृद्धेसह चारही महिलांनी गेल्या महिनाभरात वेगवेगळ्या सात सराफी दुकानांमधून दागिने चोरून नेले होते.

गौराबाई जाधव (वय ७५), संगीता जाधव (वय ४५), मंजुश्री जाधव (वय ४०) आणि राणी गायकवाड (वय ३५, सर्व रा. रामवाडी, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या टोळीतील महिलांची नावे आहेत. त्यांच्याकडून दोन लाख ९५ हजार रुपये किंमतीचे सोने-चांदीचे चोरलेले दागिने तसेच तीन बुरखे हस्तगत करण्यात आले आहेत.गेल्या महिनाभरात शहरातील वेगवेगळ्या तीन सराफी बाजारांमध्ये सात सराफी दुकानांमध्ये ग्राहक बनून, बुरख्याआड चोरी करून पसार होणाऱ्या या महिलांच्या टोळीमुळे सराफ व्यावसायिक हैराण झाले होते. न्यू पाच्छा पेठेत भारतरत्न इंदिरानगरात शिवकुमार ज्वेलर्स, सिद्धेश्र्वर पेठेतील विजापूर वेशीत, मक्का मशिदीजवळ आसीफ । पान २ वर

## चंद्रकांतदादांनी केलेलं वक्तव्य लोकांना आवडलं नाही : अजित पवार

**पुणे/प्रतिनिधी**



बारामती लोकसभा मतदारसंघात नंणद सुप्रिया सुळे यांनी भावजय सुनेत्रा पवार यांना जोरदार धक्का दिला आहे. बारामती राखण्यात सुप्रिया सुळेंना यश मिळाले आहे. तर अजित पवार गटाच्या सुनेत्रा पवारांचा पराभव झाला आहे. सध्या बारामतीत जल्लोष समोर आला आहे. बारामतीचा पराभव हा अजित पवार यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. आज अजित पवार यांनी पत्राकार परिषद घेत लोकसभा निडणुकीच्या निकालावरील विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. बारामतीचा निकालाबद्दल आश्र्चर्य वाटतं. बारामतीकरांनी मला प्रचंड पाठिंबा दिला. मात्र यावेळी त्यांनी मला पाठिंबा कसा दिला । पान २ वर

## संपादकीय

## विचार करण्याची वेळ...

लोकप्रतिनिधींकडून मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सोडविणे अपेक्षित असते. जनतेच्या आशा, आकांक्षा आणि अपेक्षांचा विचार करुन त्याची पूर्तता करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी काम केले पाहिजे, असा संकेत आहे. प्रत्येकवेळी आपलीच मते जनतेवर लादणे हे अंगलट येऊ शकते, हे सत्ताधाऱ्यांना वेळ निघून गेल्यानंतर कळते. अगदी तसाच प्रत्यय लोकसभा निवडणुकीत मतदारांनी भाजप नेत्यांना अनुभवास भाग पाडला. केंद्रात अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान आणि लालकृष्ण अडवाणी उपपंतप्रधान असताना मतदारांवर प्रभाव टाकून पुन्हा सत्तेत येण्यासाठी 'शायनिंग इंडिया'ची वातावरण निर्मिती केली. त्यासाठी अडवाणी यांनी देशव्यापी दौरा केला. परंतु, देशातील परिस्थिती शायनिंग इंडियाच्या विरोधात असताना भाजपची निवडणूक रणनीती मतदारांना पटली नाही. गेल्या दहा वर्षांपासून केंद्रात सत्तेवर असलेल्या नरेंद्र मोदी यांच्याबाबतीतही असेच घडत आहे. 'मन की बातद्वारे' ते स्वत:चे मत दुसऱ्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करतात. परंतु, देशातील जनतेची नाडी ओळखण्यात ते या निवडणुकीत कमीच पडले. 'विकसित भारत'ची त्यांची संकल्पना निश्चितच चांगली आहे. २०४७ ला भारत स्वातंत्र्याचा शतकमहोत्सव साजरा करणार असल्याने तोपर्यंत भारत विकसित करण्याचा त्यांचा संकल्प आहे. परंतु, स्वातंत्र्य मिळाल्याच्या गेल्या ७६ वर्षांनंतरही देशातील अनेक प्रश्न कायम आहेत. आजही गोरगरिबांना एकवेळचे भोजन मिळत नाही. उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणाईला नोकरीसाठी भटकावे लागते. कामगार, कष्टकरी, शेतकऱ्यांचे प्रश्न 'जैसे थे'च आहेत. देशात रस्ते बांधले, दळणवळणाची साधने उभी केली म्हणजे भारत विकसित होऊ शकत नाही. त्यासाठी प्रत्येकाचे दरडोई उत्पन्न वाढायला हवे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची एकीकडे घोषणा करायची आणि दुसरीकडे उत्पादित होणाऱ्या कृषी मालावर चाळीस टक्क्यांपर्यंत निर्यात मूल्य लादून शेतकऱ्यांच्या पायात बेड्या ठोकायच्या, हे धोरण मोदी यांना अंगलट आले. गेल्या दहा वर्षांत झालेल्या दोन निवडणुकांमध्ये बहुमतांपेक्षा अधिक जागांवर भाजपचे उमेदवार निवडून देत मोदी यांच्या ताब्यात केंद्रातील सत्ता दिली होती. तरीही शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विसर पडला. उद्योगपती आणि बड्या व्यावसायिकांचेच भले करण्याचे धोरण त्यांनी अवलंबले. त्यामुळेच मतदारांनी एनडीएला बहुमतापेक्षा काही अधिक जागा देऊन इंडिया आघाडीला त्यांची कक्षा विस्तारण्यासाठी संधी दिली.

पान १ वरुन

## गिर्यारोहणासाठी उत्तरकाशीला..

या समूहातील चार महिलांसह पाच जणांची प्रकृती खालावून मृत्यू झाला. याबाबतची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाने जमिनीवरून आणि हवाई मार्गाने बचावकार्याला सुरुवात केली. हवाई दल, एसडीआरएफ आणि खासगी हेलिकॉप्टरच्या मदतीने या गिर्यारोहकांना वाचवण्यासाठी बचाव मोहिम हाती घेण्यात आली. दरम्यान, या बचाव पथकांना काही प्रमाणात यश मिळालं असून त्यांनी या गिर्यारोहकांच्या समूहातील ११ जणांची सुटका केली आहे.

एसडीआरएफमधील वरिष्ठ अधिकारी मणिकांत मिश्रा म्हणाले, ४ गिर्यारोहक अद्याप बेपत्ता आहेत. आम्ही या बेपत्ता गिर्यारोहकांचा शोध घेत आहोत. मात्र खराब वातावरणाने पाच गिर्यारोहकांचा बळी घेतला आहे. आशा (७१), सिंधू (४५), सुजाता (५१), चित्रा परिणित (४८) आणि विनायक (५४) अशी मृत्यूमुखी पडलेल्या पाच गिर्यारोहकांची नावं आहेत. या गिर्यारोहकांचा समूहाचा गाईड आणि इतर चार जण अद्याप बेपत्ता आहेत. आम्ही त्यांना शोधण्याचा प्रयत्न करत आहोत. याआधी उत्तरकाशीमधील द्रौपदी दांडा-२ येथे हिमस्खलनामुळे २७ जणांचा मृत्यू झाला होता.

मणिकांत मिश्रा म्हणाले, खराब हवामानामुळे बचावकार्यात अडथळे येत आहेत. गिर्यारोहकांना शोधण्यासाठी पाठवलेल्या एसडीआरएफच्या पथकाला घटनास्थळी पोहोचण्यात अनेक अडचणी येत आहेत. त्याचबरोबर बुधवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि हिमालयीन भागातील खराब वातावरणामुळे हेलिकॉप्टरद्वारे बचाव मोहीम राबवता येत नाहीये. ३५ किलोमीटरच्या या अवघड हिमालयीन ट्रेकवर बचाव पथकांना पोहोचण्यातही अडथळे येत आहेत. त्यामुळे आम्ही हवाई दलाची मदत घेत आहोत. हवाई दलाने बुधवारी सकाळी सुरू केलेली शोध आणि बचाव मोहीम गुरुवारी सकाळीदेखील चालू ठेवण्यात आली आहे.पाच गिर्यारोहकांचे मृतदेह बचाव पथकांना सापडले आहेत. इतर चार जणांचा मृतदेह शोधण्याचं कामही चालू आहे.

# निवडणुकीत शेतकरी फॅक्टर कारणीभूत ठरला !, पण बळीराजाची हॅट्रिक फसली ?

लोकसभा निवडणूक शेती व शेतकरी आत्महत्या या राष्ट्रीय आपत्ती जनक विषयावर होणे गरजेचे होती. पण इलेक्ट्रॉनिक मीडिया, वृत्तवाहिन्या ,प्रसार माध्यमे व राजकीय विश्र्लेषक, राजकीय प्रवक्ते यांनी शेतकरी प्रश्र्न जाणून बुजून, बाजूला ठेवून दाबून ठेवण्याचा पूर्ण निवडणुकीत प्रकार झाला. निवडणूक जत्रा समजून सर्व धंदेवाइकाची चंगळ झाली. लोकसभा मतदार संघात कुठे जातीचे, तर कुठे स्थानिक प्रश्र्नावर राजकारण झाले.शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी ना काँग्रेसनी काम केले, ना बीजेपी ने केले . सर्व स्वार्थासाठी एकत्र येतात आणि स्वार्थासाठीच पळून जातात हे या निवडणुकीने सिद्ध केले . या देशात जातीचे फॅक्टर चर्चिले येतात मग शेतकरी फॅक्टर का चर्चेला जात नाही, आता फक्त लुटणारी टोळी म्हणजे राजकारण. तरी देखील शेतकरी फॅक्टरने ताकद दाखवून महाराष्ट्रात भाजपाचे उमेदवार पाडले हे खरे आहे. शेतकरी हा विषय राजकीय पटलावरून संपवावा. यासाठी काँग्रेस व बीजेपी या दोन्ही पक्षांनी आटोकाट प्रयत्न केले. या दोन्ही राजकीय पक्षांनी शेतकरी पक्ष टिकू दिले नाही .

महाराष्ट्रात शेतकरी संघटना कोणत्याही राजकीय पक्षाची बहुल बनु शकली नाही. तर गेली ४० वर्षे त्यांनी सत्तेच्या विरोधात दंड थोपटले. एवढी मोठी लढाई देश पातळीवर कोणत्याही राज्यात झाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या नावावर काम करणारे अनेक पक्ष कोणत्यातरी राजकीय पक्षाची कुबडी धरून काम करीत राहिले. त्यामुळे ते शेतकऱ्यांना घेऊन डुबले. व फक्त राजसत्ता भोगण्याचे काम केले. शेकाप , कम्युनिस्ट ,प्रहार हे बरेच वेळा राष्ट्रवादीने खिशात ठेवले. तसेच तेलंगणामध्ये शेतकरी नेते के. चंद्रशेखरराव यांचा विधानसभेत काँग्रेसने पाडाव केला, व नंतर आता लोकसभेत बीजेपी ने घात केला. शेतकरी पक्ष आणि शेतकरी चळवळ ही देशात वाढू नये . आता यातून शेतकरी कसे रस्ता काढतील हे त्यांनीच ठरवावे? अशा व्यवस्थेत शेतकरी चळवळीचे सामान्य नेते टिकू शकत नाही ही बाब गांभीर्याने लक्षात घ्यावी लागेल?. कोणत्याही परिस्थितीत शेतकरी नेते हाऊस मध्ये पोहोचू नये ही सर्वात मोठी खबरदारी काँग्रेस व बीजेपी या दोन्ही राजकीय पक्षांनी घेतली आहे. व जे काही निवडून आणायचे आहे ते फक्त आमच्या बोटाच्या इशाऱ्यावर नाचणारी असावी. अशीच व्यूहरचना राजकीय पक्षांनी आखली आहे.आताच्याच

### धनंजय पाटील काकडे. (ज्येष्ठ साहित्यिक)

निवडणुकीत शेतकरी नेते राजू शेट्टी, रघुनाथ दादा पाटील (हातकणंगले मतदारसंघ), रविकांत तुपकर (बुलढाणा मतदार संघ), शिवाजी नाना नांदखिले (बारामती मतदारसंघ), श्री धनंजय काकडे पाटील (जालना मतदारसंघ). आता शेतकरी नेत्यांनी शेतकरी प्रश्र्नावर काम करणे सोडून द्यावे ,ही या लोकसभेच्या निवडणुकीतून शेतकरी व्यवस्थेला बसलेली चपराक आहे. तसे मतदारांनी मतदानातून दाखवूनही दिले. भाजपाच्या सीट्स पाडण्यात महाराष्ट्रा मध्ये मराठा फॅक्टर जबाबदार आहे असे दर्शविल्या गेले. तर मग विदर्भात मराठा फॅक्टरशी कोणताही संबंध नव्हता ? मग राजकीय बदल का घडला ? शेतकऱ्याचे नाव न घेता मराठयानी मतदान बदलले हे दाखविण्याचा राजकीय विश्र्लेषकांनी प्रयत्न केला. वास्तविक पाहता महाराष्ट्रातील राजकीय गणिते बदलविण्यासाठी शेतकरी फॅक्टर कारणीभूत ठरला हे सूर्यप्रकाशा इतके सत्य आहे.

शेतकरी वर्ग आता मीटिंग, मेळाव्यासाठी जमा होत नाही, पहिले ही मंडळी स्वखर्चाने यायची. तर मग शेतकरी नेत्यांनी आपल्या कुटुंबातील पैसा खर्च करून शेतकरी प्रश्र्नावर आता तरी काम करू नये. ? एवढी चांगली अद्दल मतदारांनी घडविली. शेतकरी आत्महत्या या राष्ट्रीय आपत्तीवर मतदार जर गंभीर्याने लक्ष देत नसेल तर, एवढा मूर्खपणा या जगाच्या पातळीवर कुठेही असू शकत नाही ? म्हणजे शेतकरी प्रश्र्नावर आता निवडणुका होणार नाही अन् त्या काँग्रेस व बीजेपीला होऊ सुद्धा द्यायच्या नाहीत, ही काळ्या गोट्यावरची पांढरी रेघ आहे. म्हणून शेतकरी नेत्यांनी आता राजकीय पक्षात सामील होऊन शेतकरी प्रश्र्न वाऱ्यावर सोडावा व त्याचे होणारे परिणाम शेतकरी समाजाला भोगू द्यावे, ही या निवडणुकीने शिकवलेला शेतकरी नेत्यांना अद्दल आहे. शेतकरी आत्महत्या या राष्ट्रीय आपत्ती सारख्या विषयावर ही मंडळी दिल्लीच्या हाऊस मध्ये जाणे गरजेची होते. देशाच्या आर्थिक धोरनावर चर्चा करणारी मंडळी मतदारांनी घरात बसविली, मात्र हीरोइन निवडून येऊ शकते, एवढी मतदारांची बुद्धी भ्रष्ट झाली ? पण या मूर्खपणाचे स्वातंत्र्य सुद्धा लोकशाहीने त्यांना दिलेले आहे.

मतदारांनी निवडणूक आली की काँग्रेस - बीजेपी ला मतदान करायचे, आणि निवडणुकी झाल्यावर त्यांनीच एकमेकांच्या विरुद्ध शेती व शेतकऱ्यांच्या व्यवस्थेवर मोर्चे काढायचे, हा हंगामी धंदा वापरून बेवकुबाचे षडयंत्र सुरू झाले. मात्र मूळ प्रश्र्न न सोडविता फक्त बोंबा ठोकायचे ,याला जबाबदार मतदार , जनता, गाव पुढारी व सामाजिक नेते आहेत . देश पातळीवरील केंद्रातील, संसदेतील शेतकरी प्रश्र्न तहसील, कलेक्टर वर मोर्चे काढून हे प्रश्र्न सुटू शकत नाहीत, तर ते शेतीमालाला उत्पादन खर्चानुसार भाव वाढवून मागणारी शेतकरी नेते हाऊस मध्ये असणे गरजेचे आहे, तेव्हाच काहीतरी बदल घडेल. राजकीय पक्षाचे शेतकरी नेते हे सत्ताधीशाच्या इशाऱ्यावर, त्यांच्या बोटावर नाचणारी असतात. साधारण परिस्थितीत जगणारी शेतमजूर मंडळी ही अतिशय शुल्लक बाबीवर सरकारने फेकलेल्या , छोट्याशा तुकड्यावर समाधानी राहनारी आहे. तसेच बेरोजगाराला शेतीतून काही मिळकत दिसत नसल्यामुळे तो सुद्धा शेतीवर पाठ फिरवायला लागला, व्यापाऱ्याला स्वस्त मिळावे असे वाटते. कर्मचाऱ्याला फक्त शासनाशी देणे घेणे असल्यामुळे, त्यालाही स्वस्त खायला पाहिजे म्हणजे पैशाची बचत होईल या उद्देशाने तोही शेतकरी नेत्याला मतदानातून नाकारू लागला. मग शेतकऱ्याच्या बाजूने शिल्लक राहिले कोण ? शेतकऱ्याची मुले इतर व्यवसाय करून जगत आहेत, शेतीतील कच्च्या मालाला भाव मागण्याची लढाई चे परिणाम त्याला शेवटपर्यंत भोगावे लागणार आहेत. म्हणूनच चुकीच्या मार्गदर्शनाने दुसऱ्याच्या सांगोसांगी विचारामुळे , मासोळी ज्याप्रमाणे जाळ्यात अडकून पडली तर त्यातून निघणे मुश्किल होते. तेव्हा या जाळ्यातून निघण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या मार्गाने न जाता तो पुन्हा अडचणी पायी फसवीणाऱ्या गाव पुढाऱ्याचे जाळ्यात अलगदअडकत गेला, हीच वस्तुस्थिती राहीली . जोपर्यंत शेतकरी हा गाव पुढाऱ्याच्या बंधनातून मुक्त होत नाही, तोपर्यंत बदल होऊ शकत नाही. कारण गल्लीची नाळ दिल्लीशी आहे हे अजूनही त्याला कळले नाही. बेरोजगार विद्यार्थ्यांना निश्र्चितच वाटते शेतीत जगण्याची व्यवस्था नाही. शेतीमालाला भाव नसल्यामुळे घरात दोन पैसे उरतच नाही तर पुढे कसे जगावे हा मोठा गंभीर प्रश्र्न आजच्या तरुणांपुढे तयार झाला ?.शेती व शेतकऱ्यांचे प्रश्र्न सोडविण्यासाठी एकही लोकसभेत शेतकरी संघटनेचा अभ्यासू शेतकरी नेता असू नये, ही गंभीर बाब असून मतदारांनी केलेली दुसरी मोठी घोडचूक आहे. आता कोण तुमची गांभीर्याने दखल घेइल ? जेव्हा देशात दुष्काळ पडून अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होईल ,तेव्हाच खरी शेतकऱ्यांमध्ये जागृती जागृती होईल. शेवटी निसर्ग हाच सर्व प्रश्र्नाचे उत्तरे देत असतो.

शेतकऱ्याला स्वतःचीच बाजू सांभाळायची नाही व परजीवी जीवन जगायचे एवढा मूर्खपणा जर अंगात भरला असेल तर यापुढे शेतकरी आंदोलने करून काय फायदा होणार आहे? अशा आंदोलनाचा तमासखोर नेत्यांनाच फायदा होत असतो ? शेतकरी हा विषय केंद्रातील व थोडाफार राज्यातील असल्यामुळे विधानसभेत शेतीमालाला भाव मागणारी नेते जर गेली नाही तर निश्र्चितच शेतकरी विषय संपल्याशिवाय राहणार नाही. आणि याला स्वतः शेतकरी समाज, मतदार व सामाजिक व्यवस्था जबाबदार राहील. पत्रकार ,मीडिया, वृत्तवाहिन्या प्रसार माध्यमे, ही निवडणुकीपर्यंत तुमच्या बाजूने असतात व निवडणुकीच्या काळात ही राजकीय सत्तेच्या बाजूने जातात. कारण सर्वांना खोट्या प्रचाराला बळी पडून स्वतःचे हित व संधी साधायची असते . म्हणून निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रचारावर विश्र्वास न ठेवता जर मतदान झाले तरच तुमच्या कर्तव्याला अर्थ राहील. नाहीतर पुढेही पिढ्या ना पिढ्या त्याचे परिणाम शेतकरी समाज भोगत राहील. आर्थिक धोरणाला जिवंत ठेवण्यासाठी जातीचे समीकरणे बाजूला करावी लागेल. या निवडणुकीत बौद्ध, मुस्लिम या व्यवस्थेला शेतकरी मराठा ह्या उत्पादक समाजाने सहकार्य केले (म्हणजेच शेतीमालाला भावना न मिळाल्यामुळे ) हा बदल घडला. निवडणुकीत जातीमुळे जर बदल होणार असेल तर ,आर्थिक धोरणावर राजनीती कठीण होईल, म्हणून त्यासाठी पहिले जातीयवाद संपवावा लागेल. जय हिंद ..... जय बळीराजा.

## बुरखा परिधान करून सराफी ..

बशीर शेख यांचे सराफी दुकान, अशोक चौकातील राजेश ज्वेलर्स यांसह विविध भागातील सात सराफी दुकानात या टोळीने दागिने चोरल्याचे तपासात आढळून आले.

बुरखा पांघरलेल्या या चार महिला सराफी दुकानात सोने-चांदीचे दागिने खरेदी करण्याच्या निमित्ताने जायच्या. दुकानातील मालक आणि नोकरांचे लक्ष विचलित करून बेमालूमपणे सोन्याच्या अंगठ्या, कर्णफुले, चांदीचे पैंजण, जोडवे आदी दागिने लंपास करायच्या. याबाबत पोलिसांत गुन्हे दाखल झाल्यानंतर या बुरखाधारी महिलांच्या टोळीचा शोध घेण्यासाठी पोलीस सतर्क झाले. अखेर यात ही टोळी पोलिसांच्या हाती लागली.

## चंद्रकांतदादांनी केलेलं वक्तव्य ..

नाही, माहिती नाही. लोकशाहीत जनमताचा कौल स्वीकारायचा असतो. आगामी विधानसभा निवडणुकीत सामोरे जाण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीतील प्रमुख आहे त्यांच्याशी चर्चा करु, लोकसभा जागावाटपात त्रुटी राहिल्या. आम्ही कमी पडलो, म्हणून हरलो, असं अजित पवार यांनी सांगितले.

चंद्रकांत पाटील यांनी शरद पवारांबाबत केलेलं वक्तव्य लोकांना आवडलं नाही. तेही बारामतीत येऊन, मी याआधी देखील यावर बोललो होतो. तसेच बारामतीत मी कमी पडलो हे निर्विवाद सत्य आहे. कुठे कमी पडलो हे लोकांशी बोलल्यावरचं कळेल. विधानसभा निवडणूकीत त्या चुका टाळू, असं अजित पवार म्हणाले. तसेच मुस्लिम समाज आमच्यापासून दूर झाला. संविधान बदलण्याचा विरोधकांनी प्रचार केला त्याला मागासवर्गीय घटकाने पाठिंबा दिला, असंही अजित पवार यावेळी म्हणाले.

महायुतीने सुरुवातीच्या काळात बारामती लोकसभा मतदारसंघात बैठका घेतल्या होत्या. त्यावेळी एका बैठकीत भाजपचे आमदार चंद्रकांत पाटील म्हणाले होते की, या बैठकीनंतर शरद पवार यांना बारामतीमधून संपविणार. बारामतीमधून शरद पवार आणि त्यांचे राजकारण भाजपला संपवायचे आहे. चंद्रकांतदादांच्या या वक्तव्याचे त्यावेळी तीव्र पडसाद उमटले होते. त्यावेळी देखील अजित पवारांनी चंद्रकांत पाटील यांच्या विधानावर नाराजी दर्शवली होती.

लोकसभा २०२४ च्या निवडणुकीनंतर आज अजित पवार यांच्या नेतृत्वात मुंबईतील ट्रायडन्ट हॉटेलमध्ये राष्ट्रवादी (अजित पवार गट) च्या आमदारांची बैठक झाली. या बैठकीत पराभव झाला तरी चालेल, पण अजित पवार यांची साथ सोडणार नाही, असं आमदारांनी एकमताने निर्धार केल्याची माहिती समोर आली आहे. तसेच कुठलाही आमदार शरद पवार यांच्या पक्षातील आमदारांच्या संपर्कात नसल्याची ग्वाही देखील बैठकीला उपस्थित असणाऱ्यांनी दिल्याचं सांगण्यात येत आहे.

# योग्य वेळी योग्य पाऊले उचलू !
# 'इंडिया'च्या बैठकीनंतर खरगेंचे वक्तव्य



नवी दिल्ली : 'एनडीए'तील प्रमुख घटक पक्षांनी भाजपला सरकार स्थापनेसाठी लेखी पाठिंबा दिल्यामुळे केंद्रात 'इंडिया' आघाडीच्या सरकारची शक्यता मावळू लागल्याचे बुधवारी स्पष्ट झाले. तरीही 'इंडिया'च्या घटक पक्षांच्या नेत्यांनी सरकार स्थापनेच्या शक्यतेवर चर्चा केली. जनमताचा कौल भाजपविरोधात असून हा सत्ताधारी पक्षाची नैतिक पराभव आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी योग्य वेळी योग्य पाऊले उचलू, असे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटले आहे.

'इंडिया' आघाडीकडे २३४ चे संख्याबळ असून बहुमतासाठी विरोधकांना ३८ जागांची गरज आहे. एनडीएमध्ये असलेले नितीशकुमार व चंद्राबाबू नायडू यांनी इंडिया आघाडीला पाठिंबा दिला तरच विरोधकांचे केंद्रात सरकार स्थापन होण्याची शक्यता निर्माण होते. तसे झाले नाही तर एनडीएमध्ये नसलेल्या अन्य पक्षांचा पाठिंबा मिळवावा लागणार आहे. तृणमलू काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीच्या सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याची भूमिका यापूर्वीच स्पष्ट केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार व पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे बुधवारी दिल्लीत दाखल झाल्या. खरगेंनी फोनवरून इंडिया आघाडीच्या बैठकीसंदर्भात बोलणे झाले असले तरी, नितीशकुमार वा चंद्राबाबू नायडू यांच्याशी माझा संपर्क झालेला नाही, त्यांच्याशी मी संपर्क करणारही नाही, असे पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

आपण भाजपविरोधात निर्धाराने, एकजुटीने लढलो. यापुढेही लढत राहू. संविधानाच्या प्रस्तावनेतील मूल्यांची जपणूक करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. संविधानीतील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्यायाच्या विविध तरतुदींशी आपली मूलभूत बांधिलकी आहे, असे खरगे बैठकीत म्हणाले.खरगेंच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीमध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी-वढेरा यांच्यासह काँग्रेसचे प्रमुख नेते उपस्थित होते. त्याशिवाय, द्रमुकचे प्रमुख एम. के. स्टॅलिन, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव, ठाकरे गटाचे नेते संजय़ राऊत, अरविंद सावंत, सपचे प्रमुख अखिलेश यादव, पवार गटाचे शरद पवार, सुप्रिया सुळे, माकपचे महासचिव सीकाराम येचुरी, भाकपचे महासचिव डी. राजा, झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन, कल्पना सोरेन, आपचे संजय सिंह, राघव चड्ढा, नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला आदी नेते उपस्थित होते.

इंडिया आघाडीच्या बैठकीला तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी व शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोन नेते अनुपस्थित राहिले. 'इंडिया'चे सरकार स्थापन झाले तर बाहेरून पाठिंबा देण्याचे ममतांनी स्पष्ट केल्यामुळे त्यांच्या उपस्थितीची शक्यता कमीच होती. पण, उद्धव ठाकरे यांनी 'इंडिया' आघाडीने सरकार स्थापनेचा दावा केला पाहिजे अशी स्पष्ट भूमिका घेतली होती. असे असताना ठाकरे दिल्लीतील 'इंडिया'च्या बैठकीला गैरहजर राहिल्याने आश्र्चर्य व्यक्त केले जात होते. ठाकरेंऐवजी संजय राऊत व अरविंद सावंत बैठकीला उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार घराघरात पोहोचले पाहिजे : विनायक अंहकारी

## नळदुर्ग शहरात शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न

नळदुर्ग/दादासाहेब बनसोड

महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्त्व नसून त्यांचा त्याग रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्त्वाचे होते ज्याप्रमाणे शिवजयंती चौकात साजरी केली जाते त्या प्रमाणे प्रत्येकांच्या घरा घरात हृदयाला साक्ष ठेवून छत्रपती शिवरायांचे विचार मांडले पाहिजे छत्रपतींचा राज्याभिषेक सोहळा प्रत्येक घरामध्ये केलेच पाहिजे छत्रपती शिवरायांचे जयंती साजरी करण्यापेक्षा छत्रपती शिवरायांच्या विचारांची जयंती साजरी करणे आजच्या काळाची गरज आहे असे प्रतिपादन नळदुर्ग नगरीचे माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी केले सालाबादाप्रमाणे याहीवर्षी दि. ६ जुन रोजी नळदुर्ग येथे माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवास स्थानी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. दि. ६ जुन रोजी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त नळदुर्गचे माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावर दुग्धअभिषेक करून शिवराज्याभिषेक दिन साजरा



करण्यात आला.यावेळी नळदुर्ग शहरातील सर्वपक्षीय नेते व नागरीक उपस्थित होते. यावेळी माजी नगरसेवक संजय बताले,माजी उपनगराध्यक्ष शरद बागल, माजी नगरसेवक अमृत पुदाले, महालिंग स्वामी, बसवराज धरणे, विलास येडगे, शिवाजी नाईक, विकास सोसायटीचे चेअरमन संजय बेडगे,शिवसेनेचे सरदारसिंह ठाकूर, बलदेवसिंह ठाकुर भाजपाचे शहर अध्यक्ष धिमाजी घुगे,विकास सोसायटीचे संचालक रघुनाथ नागणे, भाजपचे युवा नेते सुशांत भुमकर, युवा व्यापारी मंडळाचे समीर मोरे, भाजपचे तालुका सरचिटणीस श्रमिक पोतदार,भाजपा युवा मोर्चाचे सागर हजारे, भगवंत सुरवसे, पत्रकार दादासाहेब बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते संजय जाधव,अमर भाळे,आंबाबाई मंदिर समितीचे अध्यक्ष रमेश जाधव, राजेंद्र महाबोले,नंदकुमार जोशी, शिवराम मोटे, प्रमोद जोशी, किशोर जोशी, अरुण जोशी, तानाजी नागणे, शिवाजी नागणे,अनिल गुरव,नारायण दोपारे,उमेश जाधव,संतोष जाधव,उमेश नाईक,सचिन भुमकर,राजकुमार वैद्य,अजित देशपांडे , प्रदीप ग्रामोपाध्याय,अमित भूमकर,संदीप वैद्य, ज्ञानेश्वर केसकर,रोहित बाले, अनिल पाटील, मारुती घोडके, अनिल कुलकर्णी, मयुर जोशी, सुहास पुराणिक अनिल पाटील , मारुती घोडके , अनिल कुलकर्णी , मयूर जोशी , सुहास पुराणिक , आदीजन उपस्थित होते. यावेळी सर्वांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावर दुग्धभिषेक करण्यात आला.

# पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण महत्वाचे : जिल्हा न्यायाधीश एम.बी.लंबे

## जिल्हा न्यायालय पंढरपूर येथे पर्यावरण दिन साजरा

पंढरपूर/प्रतिनिधीः दरवर्षी जगभरात ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. पर्यावरण दिन साजरा करण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे पर्यावरणाचे रक्षण होय, त्यासाठी पर्यावरणीय समस्यांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी व पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करणे व त्या वृक्षांची जोपासणा करणे महत्वाचे असलेबाबतचे मत जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी व्यक्त केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार गुरुवार, दिनांक ६ जून, २०२४ रोजी जिल्हा न्यायालय, पंढरपूर न्यायालयाच्या आवारामध्ये तालुका विधी सेवा समिती पंढरपूर व अधिवक्ता संघ पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने



जागतिक पर्यावरण दिन जिल्हा व सत्र न्यायाधीशएम. बी. लंबे यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.

सदर वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी न्यायाधीश श्रीमती एस. एस. पाखले, न्यायाधीश ए. ए. खंडाळे, न्यायाधीश एन. एस. बुद्रुक, न्यायाधीश पी. पी. बागुल, न्यायाधीश ए. एस. सोनवलकर, न्यायाधीश श्रीमती पी. एन. पठाडे, न्यायाधीश श्रीमती एस. ए. साळुंखे, न्यायाधीश श्रीमती पी. बी घोरपडे, पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड. आर. बी. चौगुले, सचिव ड.अभियसिंह देशमुख, पंढरपूर बारचे पदाधिकारी ड. विजयकुमार नागटिळक, सरकारी विधीज्ञ श्रीमती गौरी कुलकर्णी, अधिक्षक आर. एस. बेंबळकर, वरिष्ठ लिपिक ए. ए. उत्पात, सिस्टीम ऑफिसर नईम मोमीन, केशव उंबरकर, विशाल ढोबळे, सतिश रणदिवे, वैभव माने तसेच विधीज्ञ, पक्षकार व न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदात्त विचारांचा संपूर्ण विश्वात आदर : स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे

## स्वेरीमध्ये ३५१ वा 'शिवराज्याभिषेक दिन' उत्साहात साजरा

पंढरपूर/प्रतिनिधी : 'छत्रपती शिवाजी महाराजांचे कष्ट, गुणग्राहकता, न्याय-निवाडा, परिश्रम, वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकाभिमुखता, नेतृत्व, प्रशासन हे सर्व गुण पाहता त्यांचा आदर्श आज जगासमोर आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी केले कार्य अद्भुत आहे म्हणून त्यांच्या कार्याला



कोणत्याही मर्यादेत बांधता येत नाही. त्यांचे नेतृत्व, सवंगडी जमा करण्यासाठीचे कौशल्य, गड, किल्ले जिंकताना अवाढव्य शत्रूसमोर नियोजनबद्ध पद्धतीने आखलेली व्यूहरचना व मिळविलेले विजय या सर्व बाबी पाहिल्यास आज त्यांच्या अनेक गोष्टी अंगीकृत करणे गरजेचे आहे, आज ३५१ वर्षे झाली तरीही आपण छत्रपती शिवरायांचे संकल्प व संकल्पना याकडे अभिमानाने पाहतो कारण महाराजांची प्रत्येक गोष्ट शिकण्यासारखी व अनुकरण करण्यासारखी आहे. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदात्त विचारांचा संपूर्ण विश्वात आदर केला जातो.' असे प्रतिपादन गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील 'राष्ट्रीय सेवा योजना' या विभागाच्या वतीने ३५१ वा 'राज्याभिषेक दिन' तथा 'शिवस्वराज्य दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी भव्य शिवमुर्तीची पूजा पत्रकार दिनेश खंडेलवाल यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे 'शिवराज्याभिषेक दिना'चे महत्व विशद करत होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वेरीतील सल्लागार डॉ. आर.एन. हरिदास यांनी सूत्रसंचालन करत शिवस्तोत्र पठन केले. यावेळी स्वेरीचे संस्थापक- सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस अभिषेक घालून वंदन केले. यावेळी प्रवेश द्वाराजवळ गुलाबी, पिवळ्या व भगव्या रंगांच्या फुलांचा खुबीने वापर करून आकर्षक रांगोळी काढली होती तर पोवाडा व शिवगीताने स्वेरी कॅम्पस दुमदुमला. यावेळी पत्रकार कल्याण कुलकर्णी, धनंजय बागल, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मनियार, डी. फार्मसीचे प्राचार्य. प्रा. एस.व्ही. मांडवे, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस.मठपती, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख डॉ. एम.एम. पवार, डॉ. डी.ए.तंबोळी, डॉ.एस.बी. भोसले, डॉ.एस.ए. लेंडवे, प्रा. मनसब शेख, प्राध्यापक वर्ग व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. एम.एम. आवताडे, प्रा.आर.एस.साठे, डॉ.डी.एस.चौधरी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# चार महिन्यात ७५ लाख भाविकांनी घेतले स्वामींचे दर्शन

अक्कलकोट/प्रतिनिधी :

सलग सुट्ट्यांमुळे गेल्या साडेतीन, चार महिन्यात श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी सुमारे ७५ लाखांहून अधिक भाविकांनी स्वामींचे दर्शन घेतले. सतत वाढत चाललेल्या गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी, निवासासाठी प्रतीक्षा व नाहक त्रास, अरुंद रस्ते व अस्वच्छता यामुळे भाविकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे अक्कलकोटमध्ये पुणे, मुंबईसह देश-विदेशातून भाविकांची संख्या सतत वाढत आहे. भाविकांना दर्शनासाठी चार ते सहा तास लागत होते. वटवृक्ष देवस्थान, मुरलीधर मंदिर, समाधी मठ, गुरु मंदिर, राजेराय मठ, शिवपुरी, नवसाचा मारुती मंदिर, एकमुखी दत्त मंदिर व अन्नछत्र मंडळातील श्री शमी विघ्नेश गणेश मंदिर येथे दर्शनासाठी व महाप्रसादाकरिता श्री स्वामी



समर्थ अन्नछत्र मंडळ येथे गर्दी झाली होती. दरम्यान, शहरातील वाहनांची कोंडी टाळावी म्हणून कमलाराजे चौक, कारंजा चौक, मैंदर्गी रोड या ठिकाणी बॅरिकेडिंग करून वाहनांना मंदिर परिसरात सोडले नाही. त्यामुळे भाविकांची मिळेल त्या ठिकाणी वाहने लावण्यात येत असल्याने वाहतूक कोंडीत भर पडली. गर्दीमुळे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे यात्रीनिवास, यात्रीभवन व देवस्थान समितीचे भक्तनिवास आणि शहरातील शिवपुरी लॉज फुल्ल होते. मग एका भक्तनिवासातून दुसऱ्या भक्तनिवासाकडे, तेथून खासगी हॉटेल, लॉज करत घरगुती निवासाकडे भाविक वळत आहेत. यातून भाविकांना अव्वाच्या सव्वा रक्कम आकारली जात आहे.

# निफाड येथील गणेश नगर भागात घर फोडी

**जर एखादी व्यक्ती आपल्या परिसरात संशयास्पद रित्या फिरत असल्याचे लक्षात आले तर त्याच्यावरती नजर ठेवा व कुठल्याही प्रकारची भीती न बाळगता पोलिसांशी संपर्क साधा सर्व नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तू रोख रकमेची काळजी घ्या रात्रीच्या वेळी आपल्या घराच्या खिडक्या दारी व्यवस्थित बंद करत चला जेणेकरून पुढील येणारे संकट टाळण्यासाठी मदत होईल, पोलिसांना सहकार्य करा महत्वाचे ठिकाणी नागरीकांनी सी.सी.टिव्ही लावण्याचे आवाहन केले.-पोलिस निरीक्षक, नंदकुमार कदम निफाड**

निफाड/प्रतिनिधी

निफाड येथील गणेश नगर भागातील रहिवाशी संजय चंद्रभान राऊत यांचे घराचे खिडक्यांचे गज कापून चोरट्यांनी घर फोडी करून पाच ते सहा लाख रुपयांची सोने व रोख रक्कम लंपास केली असून या घटनेने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे सविस्तर माहिती अशी की पहाटेच्या दरम्यान संजय राऊत यांचे घराच्या बेडरूम च्या पाठीमागील खिडकीचे गज कापून चोरट्यांनी घरात प्रवेश केला व बेडरूम मधील असलेल्या लाकडी कपाटाचे कुलूप तोडून कपाटामध्ये ठेवलेल्या सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा अंदाजे पाच ते सहा लाख रुपयांचा ऐवज लंपास केला घटनेची माहिती कळताच निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नंदकुमार कदम यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली ,सदर घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आनंद पठारे पोलीस बाराहाते, राजू मनोहर, नितीन सांगळे, सागर सारंगधर, अधिक करत आहे

# प्रणिती शिंदे यांच्या विजयानंतर अक्कलकोटमध्ये जल्लोष

अक्कलकोट / शहर प्रतिनिधी :

सोलापूर लोकसभा मतदार संघात काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे मोठ्या मताने विजयी झाल्या. तब्बल पाच भाजपाच्या आमदार असलेल्या लोकसभा मतदारसंघात एकहाती लढत देत आमदार प्रणिती शिंदे यांनी नियोजनबद्ध प्रचार करत विजयश्री खेचून आणली. भाजपाचा उमेदवारही जाहीर झाला नव्हता, त्यापूर्वीच प्रणिती शिंदे यांनी अक्कलकोट मतदार संघात प्रचाराला सुरुवात केली होती. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, शहराध्यक्ष रईस टिनवाला, युवा नेत्या शीतल म्हेत्रे, प्रथमेश म्हेत्रे यांच्या मदतीने अक्कलकोट विधानसभा मतदार संघ पिंजून काढला. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची ग्रामीण भागातील पकड व प्रणिती शिंदे यांच्या नियोजयच्या जोरावर तालुक्यातील ४७४२९ हजाराची लीड तोडत ती लीड फक्त दहा हजार मतापर्यंत आणून निर्विवाद वर्चस्व मिळविले. या मतदार संघातून भाजपाने गेल्या निवडणुकीसारखे तब्बल पन्नास हजारपेक्षा लीडची अपेक्षा ठेवली होती. पण भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी सर्व भाजपाचे



पदाधिकारी यांना एकत्र करण्यात कमी पडले.

व अतिआत्मविश्वासामुळे व संपूर्ण लोकसभा मतदार संघ सांभाळावा लागल्याने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना तालुक्यात म्हणावा तेवढा वेळ देता आला नाही. परिणामी तालुक्यातील लीड कमी झाली. लोकसभेची जरी निवडणूक असली तरी आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची विधानसभेची रंगीत तालीम होती. दुधनी, मैंदर्गी, चप्पळगांव, सलगर आदी भागात काँग्रेसने दमदार कामगिरी केली. तर अक्कलकोट शहरातील लीडही तोडण्यात यशस्वी झाले. निकालाचे वृत्त हाती येताच काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, विजयाचा जल्लोष करत गुलाल उधळला. काँग्रेस शहराध्यक्ष रईस टिनवाला, मैनुद्दीन कोरबु, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुबारक कोरबु, नगरसेवक सद्दाम शेरीकर, माजी विरोधी पक्षनेता शिवानंद बिराजदार यांच्यासह कार्यकर्ते वशीम कुरेशी, शहबाज यळसंगी, सकलेन बागवान, नुर शेख, शिवशरण इचगे, रमेश स्वामी, जब्बार बागवान, शाहरुख बागवान यांनी गुलाल उधळुन फटाके फोडून आंनदोत्सव साजरा केला.

# बार्टीने आरटीई अंतर्गत वंचित घटकातील विद्यार्थ्यांचे भरले ऑनलाईन फार्म

पुणे/प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे हि संस्था अनुसुचित जाती आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी काम करणारी देशातील नामवंत संस्था असून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९( ब्लप) आरटीई अंतर्गत इंग्रजी माध्यमाच्या शाळेत वंचित घटकातील विद्यार्थ्यांना २५% जागा राखीव असुन त्या जागेवर अनुसूचित जाती व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना समतादुत प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फार्म भरुन घेण्यात यावेत असे निर्देश बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी समतादुत विभागाला दिले होते. त्यानुसार राज्यातील समतादुत प्रकल्पांतर्गत पुणे, कोकण, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, व अमरावती या सहा विभागातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये समतादुत यांनी दिनांक १६ मे २०२४ ते ४ जुन २०२४ या कालावधीत अनुसूचित जाती व वंचित घटकातील ६ हजार विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरुन घेण्यात आले.

विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता पहिली वर्गात विनामूल्य प्रवेश मिळणार आहे.बार्टीच्या उपक्रमांचे राज्यातील पालकांनी स्वागत केले. यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध होईल..

